
# संपादकीय

## कंत्राटी पद्धतीमुळे सुरक्षितता धोक्यात

मुंबईच्या कुर्ला परिसरात सोमवारी रात्री झालेल्या बेस्ट बस अपघाताने संपूर्ण शहराला हादरवून टाकले. या दुर्घटनेत आठ जणांचा मृत्यू झाला, ४९ जण जखमी झाले. घटनेनंतर आता प्रशासनाला जाग आली आहे. बेस्ट प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन समित्या स्थापन केल्या आहेत. बसचालकाला अटक झाली असली तरी, काही दिवसांनंतर तो जामिनावर बाहेर येईल. बेस्ट चालकाचा ताबा सुटल्यामुळे हा अपघात झाला की, त्याची इतर कारणे आहेत, हे चौकशीत समोर येईलच. मात्र या अपघाताचे खरे कारण शोधण्याबरोबर अन्य कारणे काय आहेत त्याचीही मुळापासून सखोल चौकशी करण्याची गरज आहे. ऑटोमॅटिक बसचा पुरेसा अनुभव नव्हता, असे बेस्ट वाहनचालकाने चौकशीत कबूल केले. त्याने गोंधळून क्लच समजून एक्स्लरेटर दाबले. या अपघातामुळे बेस्ट प्रशासन चालकांच्या प्रशिक्षण प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कमी अनुभव असलेल्या चालकांची निवड आणि प्रशिक्षणाच्या अभावामुळे कुर्ला दुर्घटनेची तीव्रता वाढल्याचे स्पष्ट झाले आहे.बेस्ट बसची जगभरात ओळख आहे. सुरक्षित प्रवासासाठी बेस्ट बसला प्रवासी पसंती देतात. मात्र गेल्या दोन वर्षांत अपघातांच्या घटना वाढल्या आहेत. त्यात सोमवारी कुर्ल्यात हादरवणाऱ्या या घटनेनंतर संताप अधिक वाढला आहे. कुर्ला येथील बेस्ट अपघातानंतर बेस्टच्या कंत्राटीकरणावरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. गेली अनेक वर्षे कंत्राटीकरणाविरोधात आवाज उठवला जात असला तरी त्याकडे दुर्लक्ष करीत बेस्टमध्ये १०० टक्के कंत्राटीकरणाचा प्रयत्न सुरू ठेवला होता. हा कंत्राटीकरणाचा डाव बेस्टच्या आता अंगलट आला आहे.कंत्राटदारांची मुजोरी, कमी वेतन त्यात कंत्राटदारांकडून वेळेवर पगार होत नसल्याने कर्मचारी, चालकांमध्ये असंतोष आदी समस्या वाढत आहेत. कुर्ल्याच्या घटनेनंतर बेस्टच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मुंबईची लोकसंख्या सतत वाढत असताना बेस्ट बसची परिस्थिती चिंताजनक बनली आहे. बेस्टने २ हजार १२६ बसगाड्या भाडेतत्त्वावर घेतल्या आहेत. गेल्या पाच वर्षांत बेस्टने आयुर्मान संपुष्टात आलेल्या तब्बल २१६० बस भंगारात काढल्या, तर बेस्टच्या मालकीच्या केवळ १०६१ बस ऑगस्ट २०२४ पर्यंत कार्यान्वित होत्या. बेस्ट उपक्रमातील स्वमालकीचा ताफा हळूहळू कमी झाला आहे. बेस्ट बस व्यवस्थेच्या खासगीकरणामुळे कायमस्वरूपी कर्मचारी आणि प्रवासी मेटाकुटीला आले आहेत.



## तुकोबांची शब्दरत्ने-१६२७

**देव भाग्यें घरा येती ।**
**संपत्ती त्या सकळा ।।-१**

धन, संपत्ती प्राप्त व्हावी, आपणाला लोकांनी मोठे म्हणावे, आपण श्रीमंत व्हावे, सुख समाधान लाभावे असे प्रत्येक जीवाला वाटत असते. पण श्रीमंतीची, भाग्याची, सुख सम ाधानाची ज्याची त्याची परीभाषा ही वेगळी असते. कोणाला धनाच्या श्रीमंतीचा हव्यास असतो तर कोणाला मनाच्या श्रीमंतीत आनंद असतो. कोणी भौतिक सुखात आनंदी होतो तर कोणी आत्मीक सुखात तल्लीन असतो. भौतिक सुखासाठी खूप धडपड करावी लागते. प्रसंगानुरुप का होईना पैशाची गरज असते. बऱ्याचवेळा खोटे बोलण्याची, इतरांना फसविण्याची, इतरांचे लुबाडण्याची वेळही भौतिक सुखाच्या प्राप्तीत येते. थोडक्यात भौतिक सुखासाठी अनेकदा निती नियमाकडे डोळेझाक करावी लागते. पण आत्मीक सुखासाठी यापैकी काहीही करावे लागत नाही. तर जे आपणाला लुबाडणार आहेत, अशा ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, अहंकार आदिंना दूर करावे लागते एवढेच. ज्याला यांना दूर करण्याचे कार्य जमले त्यांच्याकडे खरे सुख समाधान आपोआप येते. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, देव भाग्यें घरा येती । संपत्ती त्या सकळा ।।.

''जय जय राम कृष्ण हरी''



**डॉ. विजयकुमार पं.फड**
श्री माउलीनगर जालना,
भ्रमनध्वनी: 9422216448

# लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे जीवनकार्य प्रेरणादायी - आ. अब्दुल सत्तार



सिल्लोड ( प्रतिनिधी ), लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी कायम सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून दिला असे स्पष्ट करीत लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे जीवनकार्य प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन शिवसेना नेते तथा आमदार अब्दुल सत्तार यांनी गेवराई सेमी ता. सिल्लोड येथे व्यक्त केले. गेवराई सेमी येथे लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी ते बोलत होते .

पुढे बोलत असतांना आमदार अब्दुल सत्तार यांनी गोपीनाथराव मुंडे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकीत जुन्या आठवणीला उजाळा दिला. माझ्या राजकीय जीवनात गोपीनाथराव मुंडे यांनी केलेली मदत अविस्मरणीय असल्याची भावना देखील मंत्री अब्दुल सत्तार व्यक्त केली. गेवराई सेमी गावात लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळ्याचे अनावरण होत असताना मनस्वी आनंद होत असल्याचे आ.अब्दुल सत्तार म्हणाले.

याप्रसंगी माजी उपसभापती अजीज बागवान, हरिदास ताठे, दादाराव ताठे, सरपंच सतीश ताठे, ज्ञानेश्वर ताठे, नॅशनल सूतगिरणीचे संचालक विशाल जाधव, सयाजी वाघ, महादु ताठे, कडूबा कापडे, मुरलीधर कापडे, पंढरी ताठे,अंकुश ताठे, प्रकाश ताठे, शांताराम ताठे खुल्लोड येथील सरपंच नरसिंग वाघ , चेअरमन हनुमंत वाघ, तंटामुक्त अध्यक्ष कैलास वाघ, माजी चेअरमन मगन दहीकर, रामेश्वर सुरडकर, साळूबा वाघ आदींसह पंचक्रोशीतील नागरिक , गावकरी उपस्थित होते.

# शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त फळे वाटप



खुलताबाद (प्रतिनिधी.) खुलताबाद येथे शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णांना विविध प्रकारचे फळे वाटप माजी शहराध्यक्ष गजानन पाटील फुलारे व तालुकाध्यक्ष अशोक खोसरे शहराध्यक्ष निसार पठाण यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी युवक जिल्हा उपाध्यक्ष अरुण तंबारे, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष साजिद पठाण बालाजी सोमवंशी, वाल्मीक अधाने, उमेश जयस्वाल , किरण पाटील फुलारे, विवेक जगताप, कृष्णा हजारे ,सलीम सय्यद मोहम्मद शरीफ ,आप्पाराव आदाने, रंगनाथ आदाने,यावेळी उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

श्री. ए.बी. बिरादार साहेब, दिवाणी न्यायाधीश क. स्तर सिल्लोड यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज कं. ३५२/२०२४

अर्जदार:- १. मनकर्णाबाई भ्र. रामवास इंगळे, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. मंगरुळ, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर,२. शिवाजी पि. रामदास इंगळे, वय २९ वर्षे, धंदा शेती, रा. मंगरुळ, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर. ३. श्रध्दा भ्र. परमेश्वर फुके, वय २६ वर्षे, धंदा घरकाम, रा. मुकुंदवाडी, ता. जि. छत्रपती संभाजीनगर. ४. गणेश पि. रामदास इंगळे, वय २४ वर्षे, धंदा शिक्षण रा. मंगरुळ, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार- महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर.
विषय- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र (हेअरशीप) मिळणे बाबत

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांचे वकील ॲड. विशाल एस. शेजुळ यांचे मार्फत प्रस्तुत अर्जदार यांनी स्व. रामदास चिमाजी इंगळे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी मा. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ यांचे पती व अर्जदार क्रमांक २ ते ४ यांचे वडील नामे स्व. रामदास चिमाजी इंगळे यांचे दिनांक १९.०४.२०२४ रोजी निधन झालेले आहे.

अर्जदार यांना मयत स्व. रामदास चिमाजी इंगळे यांचे वारस प्रमाणपत्राची शासकीय, निमशासकीय व महसूल कामासाठी आवश्यकता आहे. त्यासाठी अर्जदार यांनी मा. न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे. जर कोणास सदर वारस प्रमाणपत्र देण्यास काही आक्षेप, उजर, हरकती असतील तर अशांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत आक्षेप, उजर, हरकती या न्यायालयात सादर कराव्यात. जर मुदतीत कोणी आक्षेप, उजर, हरकती न दर्शविल्यास स्व. रामदास चिमाजी इंगळे यांचे वारस प्रमाणपत्र देण्याबाबत योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक ०९.१०.२०२४ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले.

पु.ता. १४/११/२०२४

स्वाक्षरीत/-
विभागीय लिपीक
दिवाणी न्यायालय, सिल्लोड

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर सिल्लोड

## जाहीर प्रगटन

श्रीमती ए. के. दामटे साहेब, दिवाणी न्यायाधीश क. स्तर सिल्लोड यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३४५/२०२४

अर्जवार :- १. सविताबाई भ्र. रत्नाकर वानखेडे, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. तळणी, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर. २. किरण रत्नाकर बानखेडे, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. तळणी, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर. ३. सागर रत्नाकर वानखेडे, वय २८ वर्षे, धंवा शेती, रा. तळणी, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर. ४. कविता विठ्ठल सोनवणे, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. सिल्लोड, ता. सिल्लौड, जि. छत्रपती संभाजीनगर. ५. किर्ती औदुंबर विखनकर, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. चिंचोली (लिं.), ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार- महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर.
विषय- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र (हेअरशीप) मिळणे बाबत

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांचे वकील ॲड. विशाल एस. शेजुळ यांचे मार्फत प्रस्तुत अर्जदार यांनी स्व. रत्नाकर रामचंद्र वानखेडे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी मा. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ यांचे पती व अर्जदार क्रमांक २ ते ५ यांचे वडील नामे स्व. रत्नाकर रामचंद्र वानखेडे यांचे दिनांक २८.०६.२०२४ रोजी निधन झालेले आहे.

अर्जदार यांना मयत स्व. स्व. रत्नाकर रामचंद्र वानखेडे यांचे वारस प्रमाणपत्राची शासकीय, निमशासकीय य महसूल कामासाठी आवश्यकता आहे. त्यासाठी अर्जदार यांनी मा. न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे. जर कोणास सदर वारस प्रमाणपत्र देण्यास काही आक्षेप, उजर, हरकती असतील तर अशांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत आक्षेप, उजर, हरकती या न्यायालयात सादर कराव्यात. जर मुदतीत कोणी आक्षेप, उजर, हरकती न दर्शविल्यास स्व. रत्नाकर रामचंद्र वानखेडे यांचे वारस प्रमाणपत्र देण्याबाबत योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

आज दिनांक.१०.२०२४ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले.

पु.ता. ०७/११/२०२४

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
विभागीय लिपीक
दिवाणी न्यायालय, सिल्लोड

स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर सिल्लोड

## जाहीर प्रगटन

श्री. ए.बी. बिरादार साहेब, दिवाणी न्यायाधीश क. स्तर सिल्लोड
यांच्या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ३४०/२०२४

अर्जदार : १. श्रीमती मंगलाबाई भ्र. सुरेश पार्दै वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. अन्वी, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर. २. प्रमोद पि. सुरेश पार्वे वय २८ वर्षे, धंदा शेती, रा. अन्वी, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर. ३. सौ. अश्विनी भ्र. लक्ष्मण बखळे, वय ३१ वर्षे, धंदा घरकाम रा. खामगांव, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार- महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर.
विषय- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र (हेअरशीप) मिळणे बाबत

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांचे वकील ॲड. विशाल एस. शेजुळ यांचे मार्फत प्रस्तुत अर्जदार यांनी स्व. सुरेश माणिकराव पार्वे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी मा. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ यांचे पती व अर्जदार क्रमांक २ व ३ यांचे वडील नामे स्व. सुरेश माणिकराव पार्वे यांचे दिनांक २९.०९.२०१६ रोजी निधन झालेले आहे.

अर्जदार यांना मयत स्व. सुरेश माणिकराव पार्वे यांचे वारस प्रमाणपत्राची शासकीय, निमशासकीय व महसूल कामासाठी आवश्यकता आहे. त्यासाठी अर्जदार यांनी मा. न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे. जर कोणास सदर वारस प्रमाणपत्र देण्यास काही आक्षेप, उजर, हरकती असतील तर अशांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत आक्षेप, उजर, हरकती या न्यायालयात सादर कराव्यात. जर मुदतीत कोणी आक्षेप, उजर, हरकती न दर्शविल्यास स्व. सुरेश माणिकराव पार्वे यांचे वारस प्रमाणपत्र देण्याबाबत योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

आज दिनांक ०९.१०.२०२४ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले.

पु.ता. ११/११/२०२४

विभागीय लिपीक
स्वाक्षरीत/-
ग दिवाणी न्यायालय, सिल्लोड

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर सिल्लोड

---

**एल&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** औरंगाबाद

L&T Finance

## गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 06.12.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1)दीपक गोविंदाप्पा वैद्य<br>2)जयश्री दीपक वैद्य | **अनुसूची -I**<br>अशा मालमत्तेचे सर्व भाग आणि खंड जिचा पत्ता आहे : रो हाऊस क्र. 2 अधिमापन (38.50 चौरस मीटर) चटई क्षेत्रफळ 28.48 चौरस मीटर, बांधकाम क्षेत्रफळ 34.66 चौरस मीटर आणि सुपर बिल्ट अप क्षेत्रफळ 38.25 चौरस मीटर सोबत आरसीसी, ''युनायटेड आरंभ पार्ट-2'' नावाच्या प्रकल्पामध्ये स्थित, प्लॉट क्र. 15 वर बांधलेले, गट क्र. 90, गंगापुर जहांगीर, जि. औरंगाबाद महाराष्ट्र 431007.<br>सीमारेषा: पूर्व - रो हाऊस क्र. 3, प्लॉट क्र. 16; पश्चिम - रो हाऊस क्र. 1, प्लॉट क्र. 14; उत्तर - प्लॉट क्र. 28; दक्षिण - 9.00 मीटर रुंद रस्ता | AURHL1900 0138 & AURHL1900 0140 | 21/08/2024 | रु. 78,148/- | रु. 34,05,329.02/- | रु. 7,81,488/- | सर्व कामकाजांच्या दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30 पूर्वनियोजित भेटीसह. | 13/01/2025 दुपारी 12 ते दुपारी 2.00 |
| | **अनुसूची -II**<br>अशा मालमत्तेचे सर्व भाग आणि खंड जिचा पत्ता आहे : रो हाऊस क्र. 3 अधिमापन (38.50 चौरस मीटर) चटई क्षेत्रफळ 28.48 चौरस मीटर, बांधकाम क्षेत्रफळ 34.66 चौरस मीटर आणि सुपर बिल्ट अप क्षेत्रफळ 38.25 चौरस मीटर सोबत आरसीसी, ''युनायटेड आरंभ पार्ट-2'' नावाच्या प्रकल्पामध्ये स्थित, प्लॉट क्र. 16 वर बांधलेले, गट क्र. 90, गंगापुर जहांगीर, जि. औरंगाबाद महाराष्ट्र 431007.<br>सीमारेषा: पूर्व - रो हाऊस क्र. 3, प्लॉट क्र. 17; पश्चिम - रो हाऊस क्र. 1, प्लॉट क्र. 15; उत्तर - प्लॉट क्र. 27; दक्षिण - 9.00 मीटर रुंद रस्ता | | | रु. 75,978/- | | रु. 7,59,780/- | | |

### सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना 12/01/2025 रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे 13/01/2025 रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे14/01/2025 भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे **नाव : शेखर काळे, संपर्क क्र. 9823271111, एल&टी फायनान्स लि. - एल&टी फायनान्स लि. 1ला मजला, रत्नप्रभा कॉम्प्लेक्स, जालना रोड, औरंगाबाद - 431001 आणि संतोष तिवारी, संपर्क क्र. 9920490126, एल अँड टी फायनान्स लि. - ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुर्दीनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 13.12.2024
**ठिकाण:** औरंगाबाद

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

---

**एल्&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव, एल्&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल्&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 00 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** औरंगाबाद

L&T Finance

## गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 06.12.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. गजानन उमाळकर<br>2. अंकिता उमाळकर | **वेळापत्रक -I**<br>मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल पत्ता: अपार्टमेंट क्र.06, 47.44 चौ. मीटर बांधलेली जागा (37.75 चौ.मीटर चटई क्षेत्र) स्टिल्ट तिसऱ्या मजल्यावर सक्षम हाईट्स ग्रोथ सेंटर, वाळूज महानगर-i, सिडको, गट क्र.173/p, तिसगाव, तालुका आणि जिल्हा औरंगाबाद येथे प्लॉट क्र.203 वर बांधण्यात आले आहे ज्याची सीमा खालीलप्रमाणे आहे,<br>सिमा: पूर्व - जीना आणि अपार्टमेंट क्रमांक 05 आणि कॉमन टेरेस; पश्चिम - साइड मार्जिन आणि 18 मीटर रुंद रस्ता; उत्तर - साइड मार्जिन आणि 18 मीटर रुंद रस्ता; दक्षिण - साइड मार्जिन आणि प्लॉट क्र. 202 | H17776220621050100 / H17776220621050100L | 12.11.2024 | रु. 1,80,000/- | रु. 28,40,708.54/- | रु. 18,00,000/- | सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30 या वेळेत पूर्व भेटीसह. | 17.01.2025 दुपारी 12:30 ते 2.00 पर्यंत |

### सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **12/01/2025** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी एलटीएफ द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **13/01/2025** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **14/01/2025** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात जसे की **नाव - श्री शेखर काळे, संपर्क क्रमांक 9823271111, आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लिमिटेड, ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट क्रमांक 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो. त्याची आणि कोणतीही पूर्वसूचना न देता.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुर्दीनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 13.12.2024
**ठिकाण:** औरंगाबाद

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल्&टी फायनान्स लिमिटेड

Printed at Anand nagari prakashan pvt. ltd. A/14, additional M.I.D.C., Jalna & published by Ravindra Mishrilal Bangad on behalf of Anand nagari prakashan pvt. ltd. at Jyotimarya Complex, Block no. 5 & 32 Jalna road, Aurangabad (Maharashtra). Tel.: (0240) 2483911, Fax: 2481910, Editor: Ravindra Mishrilal Bangad*. (*Responsible for selection of news under P & RB act.). Jalna 13th year. E-mail: anandnagri@gmail.com. (All desputes under Jalna jurisdiction). It is not necessary to the editorial board that they agree with the opinions expressed through matter and articles published in this newspaper. RNI no. MAHMAR/2012/26780.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक आणि संपादक रवींद्र मिश्रीलाल बांगड* यांनी आनंद नगरी प्रकाशन प्रा.लि. ए/१४, ॲडिशनल एम.आय.डी.सी., जालना येथे छापून कार्यालय ज्योतिर्मय कॉम्प्लेक्स गाळा क्रं. ५ व ३२ जालना रोड औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. फोन नं. ०२४०-२४८१८०९, २४८३९११ फॅक्स २४८१९१० औरंगाबाद वर्ष १३वे. (* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे). ई मेल : anandnagri@gmail.com (सर्व वाद जालना न्यायालयाअंतर्गत) या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकूर व लेख या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. आरएनआय नं.एमएएचएमएआर/२०१२/२६७८०